# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील १० वा रविवार – ०९ जून २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू ः** बंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना देवाच्या इच्छेप्रमाणे वागण्यासाठी भाविकांना मार्गदर्शन करण्यास पवित्र आत्म्याकडून कृपा व चांगले आरोग्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या देशात नव्याने निवडून आलेल्या सरकाराने चांगले लोकोपयोगी कार्य करावे, त्यांच्या हातून जनतेला घटनेद्वारे मिळालेल्या सर्व मूलभूत हक्कांचे रक्षण केले जावे व देशाला प्रगतीपथावर नेण्यास त्यांना प्रभूकडून मार्गदर्शन लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आजच्या शुभवर्तमानात प्रभू म्हणतात की जो कोणी देवाच्या इच्छेप्रमाणे वागतो तोच माझा भाऊ, बहीण व आई आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आपण नेहमी प्रभूच्या इच्छेप्रमाणे वागून ख्रिस्ताचे उत्तम व आदर्श सेवक बनावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. ख्रिस्तसभेच्या सर्व अधिका-यांनी प्रभूचे विश्वासू उत्तराधिकारी बनावे, सर्व प्रापंचिकांचा प्रभूवरील विश्वास दृढ व्हावा व एकमेकांवर प्रेम करून प्रभूच्या प्रेमाचा आनंद आपल्या कुटुंबांत तसेच परिसरात आपल्याला अनुभवता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या सर्व बालकांवर, वयोवृद्धांवर व आजारी लोकांवर प्रभूचा वरदहस्त असावा, आपल्याला चांगले हवामान व पुरेशा पाऊसाची देणगी मिळावी, जगात सर्वत्र शांती नांदावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू ः** हे स्वर्गीय पित्या तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.